लोकमत

न्यूज Inbox



# जनजागृतीबद्दल पांगे यांचा सत्कार

**उमरगा :** तालुक्यातील कोरेगाव येथील रहिवासी व सध्या लातूर येथे शिकत असलेल्या सायबर तज्ज्ञ प्रतीक्षा पांगे यांच्यामार्फत क्विक हिल फाउंडेशन व राजर्षी शाहू महाविद्यालय यांच्या माध्यमातून मराठवाड्यात विविध ठिकाणी सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती सुरू आहे. याबद्दल आ. ज्ञानराज चौगुले यांनी त्यांचा सत्कार करीत त्यांचे हे कार्य कौतुकास्पद असल्याचे सांगितले. यावेळी तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, युवती सेना मराठवाडा निरीक्षक आकांक्षाताई चौगुले, गणप्रमुख शरद इंगळे, विद्यार्थीसेना तालुकाप्रमुख संदीप चौगुले, युवा सेना शहर प्रमुख अमर शिंदे, राज शिंदे आदी उपस्थित होते.

Hello Dharashiv
Page No. 3 Sep 15, 2024
Powered by: erelego.com